2021

# नवनीत सराव प्रश्नपत्रिका व कृतिपत्रिका

## इयत्ता दहावी

शैक्षणिक वर्ष 2020-21 साठी वगळलेल्या घटकांनुसार अद्ययावत

**विषय :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| My English (LL) | मराठी (कुमारभारती) | हिंदी (लोकभारती) | इतिहास - राज्यशास्त्र | भूगोल |
| विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग 1) | विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग 2) | गणित (भाग-I) | गणित (भाग-II) | |

**प्रत्येक विषयात :**

- प्रश्नपत्रिकेचा/कृतिपत्रिकेचा अद्ययावत आराखडा
- बोर्डाची मार्च 2020ची प्रश्नपत्रिका/ कृतिपत्रिका सोल्यूशन्ससह
- सरावासाठी 5 प्रश्नपत्रिका/कृतिपत्रिका

सराव प्रश्नपत्रिकांची संपूर्ण उत्तरे QR Code वर

GET NAVNEET DigiBook FREE

NAVNEET®

# 2021 नवनीत सराव प्रश्नपत्रिका व कृतिपत्रिका इयत्ता दहावी

शैक्षणिक वर्ष 2020–21 साठी वगळलेल्या घटकांनुसार अद्ययावत

## सर्व विषय :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| English (LL) | मराठी (कुमारभारती) | हिंदी (लोकभारती) | इतिहास – राज्यशास्त्र | भूगोल |
| विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग 1) | विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग 2) | गणित (भाग–I) | गणित (भाग–II) | |

- **ठळक वैशिष्ट्ये :**

* बोर्डाच्या 2021 च्या परीक्षेसाठी परिपूर्ण रचना.
* प्रत्येक विषयात सुरुवातीला 'अत्यंत महत्त्वाचे' या अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2020-21 साठी वगळलेल्या अभ्यासक्रमाची सविस्तर नोंद.
* प्रत्येक विषयात **प्रश्नपत्रिकेचा/कृतिपत्रिकेचा** अद्ययावत आराखडा.
* प्रत्येक विषयात बोर्डाची मार्च 2020 ची प्रश्नपत्रिका/कृतिपत्रिका आदर्श उत्तरांसह.
* या प्रश्नपत्रिकांतील/कृतिपत्रिकांतील वगळलेल्या अभ्यासक्रमावरील प्रश्न व उत्तरे नोंदीसह छायांकित.
* प्रत्येक विषयात वगळलेला अभ्यासक्रम लक्षात घेऊन तज्ज्ञ व अनुभवी लेखकांनी तयार केलेल्या 5–5 प्रश्नपत्रिका/कृतिपत्रिका सरावासाठी आणि त्यांची संपूर्ण उत्तरे QR code वर.
* गणित (भाग–I व II) या विषयांच्या सराव प्रश्नपत्रिकांत पडताळ्यासाठी **उत्तरे**.

**नवीन वैशिष्ट्य यंदा प्रथमच**

ऑडियो फीचर **नवनीत** DigiBook वर

*(अधिक माहितीसाठी समोरचे पान पाहा.)*

सराव प्रश्नपत्रिकांच्या अचूक व आदर्श उत्तरांसाठी QR code स्कॅन करा. तुमच्या उत्तरपत्रिकांचे स्वत:च मूल्यमापन करा.

NAVNEET®

नवनीत एज्युकेशन लिमिटेड

D0649

किंमत : ₹ 280.00

हिंदी (लोकवाणी) व संस्कृत (संयुक्त) *किंवा* संस्कृत (संपूर्ण) या भाषा विषयांसाठी वगळलेला अभ्यासक्रम, कृतिपत्रिकांचे अद्ययावत आराखडे व बोर्डाच्या 2020 च्या कृतिपत्रिका यांनुसार अद्ययावत

# नवनीत
# सराव कृतिपत्रिका

## इयत्ता दहावी

| ऐच्छिक विषय | हिंदी (लोकवाणी) 40 गुण | संस्कृत (संयुक्त) 40 गुण | संस्कृत (संपूर्ण) 80 गुण |
|---|---|---|---|

GET NAVNEET DigiBook FREE

प्रत्येक विषयात :

- शैक्षणिक वर्ष 2020 – 21 साठी वगळलेल्या घटकांची सविस्तर नोंद
- कृतिपत्रिकेचा अद्ययावत आराखडा
- बोर्डाच्या 2020 च्या कृतिपत्रिका सोल्यूशन्ससह
- सरावासाठी 5 कृतिपत्रिका
- सरावाच्या सर्व कृतिपत्रिकांची संपूर्ण उत्तरे QR code वर!

हे पुस्तक सर्व पुस्तक-विक्रेत्यांकडे उपलब्ध

*सराव भरपूर, तर यश पुरेपूर!*

नवनीत एज्युकेशन लिमिटेड

**मुंबई** : नवनीत भवन, भवानीशंकर रोड, दादर (पश्चिम), **मुंबई – ४०० ०२८.** (फोन : ६६६२ ६५६५)

www.navneet.com ● **e-mail :** publications@navneet.com

**अहमदाबाद** : नवनीत हाउस, गुरुकुल रोड, मेमनगर, **अहमदाबाद – ३८० ०५२.** (फोन : ६६३० ५०००)

**पुणे** : नवनीत भवन, १३०२, शुक्रवार पेठ, सणस प्लाझाजवळ, बाजीराव रोड, **पुणे – ४११ ००२.** (फोन : २४४३ १००७)

**नागपूर** : ६३, शिवाजी सायन्स कॉलेजसमोर, काँग्रेसनगर, **नागपूर – ४४० ०१२.** (फोन : २४२ १५२२)

**नाशिक** : निर्माण इन्स्पायर, दुसरा मजला, कान्हेरे वाडी, जुन्या सीबीएसच्या समोर, **नाशिक – ४२२ ००१.** (फोन : २५९ ६९५०)

**© All rights reserved. No part of this book may be copied, adapted, abridged or translated, stored in any retrieval system, computer system, photographic or other system or transmitted in any form or by any means without a prior written permission of the copyright holders, M/s. Navneet Education Limited.** ***Any breach will entail legal action and prosecution without further notice.***

**Published by** Navneet Education Limited, Dantali, Gujarat.
**Printed by** Navneet Education Limited, Dantali, Gujarat.

2121
CTP
Rev. (28-12-2020)

# मनोगत

आजवर कधीही अनुभवली नाही, अशी ही आकस्मिक उद्भवलेली 'कोविड-19' परिस्थिती! अशा परिस्थितीतही समग्र महाराष्ट्राचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व त्यांचे पालक इयत्ता दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेला सर्वोच्च प्राधान्य देऊन तांत्रिक साधनांच्या साहाय्याने अध्यापन-अध्ययन कार्य करीत आहेत, हे खचितच गौरवास्पद आहे. या ज्ञानयज्ञात साहाय्यभूत होण्यासाठी अग्रेसर शैक्षणिक प्रकाशक या नात्याने आम्हीही कटिबद्ध आहोत. याच भूमिकेतून बोर्डाच्या 2021च्या परीक्षेसाठी अद्ययावत आराखड्यानुसार **'नवनीत सराव प्रश्नपत्रिका व कृतिपत्रिका (सर्व विषय) : इयत्ता दहावी'** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला अत्यंत आनंद होत आहे.

'कोविड-19' परिस्थितीमुळे अध्यापन-अध्ययन कार्यासाठी मिळणारा कमी कालावधी लक्षात घेता, बोर्डाने शैक्षणिक वर्ष 2020-21 करिता प्रत्येक विषयातील काही घटक मूल्यमापनातून म्हणजेच परीक्षेतून वगळले आहेत. हा वगळलेला अभ्यासक्रम लक्षात घेऊनच प्रस्तुत **'नवनीत सराव प्रश्नपत्रिका व कृतिपत्रिका'** तयार करण्यात आल्या आहेत, हे या पुस्तकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

प्रस्तुत पुस्तकात प्रत्येक विषयात सुरुवातीलाच 'अत्यंत महत्त्वाचे' या चौकटीत त्या त्या विषयातील उपरोल्लेखित वगळलेल्या अभ्यासक्रमाची सविस्तर व सुलभ नोंद देण्यात आली आहे. त्यामुळे नेमक्या कोणत्या घटकांचा परीक्षेसाठी अभ्यास करायचा, हे विद्यार्थ्यांच्या सहज लक्षात येईल.

त्यानंतर प्रत्येक विषयाचा बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेचा/कृतिपत्रिकेचा अद्ययावत आराखडा मार्गदर्शनासह व स्पष्टीकरणासह देण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेच्या/कृतिपत्रिकेच्या स्वरूपाविषयी कोणतीही शंका राहणार नाही.

त्यानंतर विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनार्थ प्रत्येक विषयात बोर्डाची मार्च 2020 ची प्रश्नपत्रिका/कृतिपत्रिका संपूर्ण सोल्यूशन्ससह व गुणदानपद्धतीसह सोडवून देण्यात आली आहे. ही प्रश्नपत्रिका/कृतिपत्रिका व त्यांची उत्तरे देताना, या वर्षी वगळलेल्या घटकांवरील प्रश्न व उत्तरे नोंदीसह छायांकित करून देण्यात आली आहेत. जेणेकरून या घटकांवरील प्रश्न परीक्षेत येणार नाहीत, याची जाणीव विद्यार्थ्यांना होईल; पण त्याचबरोबर संबंधित प्रश्नप्रकारांत कोणते प्रश्न विचारले जाऊ शकतात आणि त्यांची उत्तरे कशी लिहावीत, याची समज विद्यार्थ्यांना आपोआपच येईल. बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेचे/कृतिपत्रिकेचे सोल्यूशन्स खासकरून उत्तरपत्रिकेच्या नमुन्यावर सोडवून देण्यात आले आहेत. त्यामुळे उत्तरपत्रिकेत उत्तरे कशी लिहावीत, याचा आदर्श वस्तुपाठच विद्यार्थ्यांना मिळेल.

**'नवनीत सराव प्रश्नपत्रिका व कृतिपत्रिका'** या पुस्तकात **प्रत्येक विषयात सरावासाठी 5 प्रश्नपत्रिका/कृतिपत्रिका** देण्यात आल्या आहेत. नवनीतच्या तज्ज्ञ व अनुभवी लेखकांनी **या वर्षासाठी वगळलेला अभ्यासक्रम लक्षात घेऊन** या सराव प्रश्नपत्रिकांची रचना केली आहे. हे करताना **पाठ्यपुस्तके आणि 'अद्ययावत आराखड्यातील' सर्व संभाव्य विविध प्रश्नप्रकारांचा आवर्जून समावेश** होईल हे खासकरून पाहिले आहे. तसेच गणित (भाग–I) व (भाग–II) या विषयांत **सराव प्रश्नपत्रिकांतील प्रश्नांची उत्तरे** पडताळ्यासाठी देण्यात आली आहेत.

थोडक्यात, बोर्डाच्या 2021 च्या परीक्षेची परिपूर्ण तयारी व सराव करण्यासाठी प्रस्तुत **'नवनीत सराव प्रश्नपत्रिका व कृतिपत्रिका'** हे पुस्तक विद्यार्थ्यांना खूपच उपयोगी ठरेल आणि याच्या सरावाने विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेमध्ये उज्ज्वल यश लाभेल, असा विश्वास आम्हांस वाटतो.

**दहावीतील सर्व विद्यार्थ्यांना उज्ज्वल यशासाठी 'नवनीत'च्या हार्दिक शुभेच्छा!**

**– प्रकाशक**

# अनुक्रमणिका


पृष्ठ क्र.

★ **विभाग 1 : ENGLISH (LL)**

Reduced Syllabus and Updated Format of Board's Activity Sheet ... ५ ते १३

Board's March 2020 Activity Sheet with Solutions ... १४ ते ४४

Activity Sheets 1 to 5 (For Practice) ... ४५ ते ९७

★ **विभाग 2 : मराठी (कुमारभारती)**

वगळलेला अभ्यासक्रम व कृतिपत्रिकेचा अद्ययावत आराखडा ... ९८ ते १०४

बोर्डाची मार्च 2020 ची कृतिपत्रिका आदर्श उत्तरांसहित ... १०५ ते १३२

कृतिपत्रिका 1 ली ते 5 वी (सरावासाठी) ... १३३ ते १७३

★ **विभाग 3 : हिंदी (लोकभारती)**

हटाए गए पाठ्यक्रम और कृतिपत्रिका का अद्‌यतन प्रारूप ... १७४ ते १७८

बोर्ड की मार्च 2020 कृतिपत्रिका आदर्श उत्तरों सहित ... १७९ ते २०६

कृतिपत्रिका 1 से 5 (अभ्यास के लिए) ... २०७ ते २५१

★ **विभाग 4 : इतिहास–राज्यशास्त्र**

वगळलेला अभ्यासक्रम व कृतिपत्रिकेचा अद्ययावत आराखडा ... २५२ ते २५५

बोर्डाची मार्च 2020 ची कृतिपत्रिका आदर्श उत्तरांसह ... २५६ ते २७३

कृतिपत्रिका 1 ली ते 5 वी (सरावासाठी) ... २७४ ते २९६

★ **विभाग 5 : भूगोल**

वगळलेला अभ्यासक्रम व प्रश्नपत्रिकेचा अद्ययावत आराखडा ... २९७ व २९८

बोर्डाची नमुना प्रश्नपत्रिका आदर्श उत्तरांसह ... २९९ ते ३१३

प्रश्नपत्रिका 1 ली ते 5 वी (सरावासाठी) ... ३१४ ते ३३५

★ **विभाग 6 : विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग 1)**

वगळलेला अभ्यासक्रम व कृतिपत्रिकेचा अद्ययावत आराखडा ... ३३६ ते ३३८

बोर्डाची मार्च 2020 ची कृतिपत्रिका आदर्श उत्तरांसह ... ३३९ ते ३५२

कृतिपत्रिका 1 ली ते 5 वी (सरावासाठी) ... ३५३ ते ३६७

★ **विभाग 7 : विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग 2)**

वगळलेला अभ्यासक्रम व कृतिपत्रिकेचा अद्ययावत आराखडा ... ३६८ व ३६९

बोर्डाची मार्च 2020 ची कृतिपत्रिका आदर्श उत्तरांसह ... ३७० ते ३८३

कृतिपत्रिका 1 ली ते 5 वी (सरावासाठी) ... ३८४ ते ४०३

★ **विभाग 8 : गणित (भाग–I)**

वगळलेला अभ्यासक्रम व प्रश्नपत्रिकेचा अद्ययावत आराखडा ... ४०४ ते ४०६

बोर्डाची मार्च 2020 ची प्रश्नपत्रिका आदर्श उत्तरांसह ... ४०७ ते ४२६

प्रश्नपत्रिका 1 ली ते 5 वी (सरावासाठी) ... ४२७ ते ४४६

प्रश्नपत्रिका 1 ली ते 5 वी – उत्तरे ... ४४७ ते ४४९

★ **विभाग 9 : गणित (भाग–II)**

वगळलेला अभ्यासक्रम व प्रश्नपत्रिकेचा अद्ययावत आराखडा ... ४५० ते ४५२

बोर्डाची मार्च 2020 ची प्रश्नपत्रिका आदर्श उत्तरांसह ... ४५३ ते ४७२

प्रश्नपत्रिका 1 ली ते 5 वी (सरावासाठी) ... ४७३ ते ४९३

प्रश्नपत्रिका 1 ली ते 5 वी – उत्तरे ... ४९४ ते ४९६

# विभाग 4 : इतिहास – राज्यशास्त्र

**अत्यंत महत्त्वाचे**

**नोंद :** शैक्षणिक वर्ष 2020 – 21 करिता होणाऱ्या मूल्यमापनातून पुढील प्रकरणे वगळण्यात आली आहेत :

**इतिहास –** प्रकरण क्र. ४ : भारतीय कलांचा इतिहास

प्रकरण क्र. ६ : मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास

**राज्यशास्त्र –** प्रकरण क्र. ५ : भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने

**बोर्डाच्या मार्च 2020 च्या कृतिपत्रिकेतील या प्रकरणांतील प्रश्नांना छायांकित करण्यात आले आहे.**

**सदर सराव प्रश्नपत्रिका (कृतिपत्रिका) वगळलेले पाठ लक्षात घेऊनच तयार करण्यात आल्या आहेत.**

## बोर्डाच्या कृतिपत्रिकेचा अद्ययावत आराखडा
## (मार्गदर्शन व स्पष्टीकरण यांसह)

**(इतिहास : २८ गुण, राज्यशास्त्र : १२ गुण)**

**नोंद :**
- इतिहास व राज्यशास्त्र हे दोन्ही विषय एकाच उत्तरपत्रिकेत सोडवायचे आहेत.
- ४० गुणांची कृतिपत्रिका सोडवण्यासाठी २.०० तासांचा कालावधी असेल.

## इतिहास

### प्र. 1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा : ३

**लक्षात ठेवा :**

(i) या प्रश्नप्रकारात एकूण तीन उपप्रश्न दिले जातील. तीनही उपप्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे.

(ii) प्रत्येक विधानासाठी दिलेल्या चार पर्यायांतून योग्य पर्याय निवडा.

(iii) निवडलेल्या योग्य पर्यायांसह विधाने पूर्ण लिहा.

(iv) उत्तरासाठी निवडलेले पर्याय अधोरेखित करा.

### प्र. 1. (ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून लिहा : ३

**लक्षात ठेवा :**

(i) या प्रश्नप्रकारात चार जोड्यांचा एक गट असे एकूण तीन गट दिले जातील.

(ii) प्रत्येक गटात तीन बरोबर जोड्या व एक चुकीची जोडी दिली जाईल.

(iii) उत्तरात केवळ चुकीची जोडी ओळखून लिहायची आहे. चुकीची जोडी दुरुस्त करून लिहिण्याची गरज नाही.

## प्र. 2. (अ) दिलेल्या सूचनांप्रमाणे कृती करा : *(कोणत्याही दोन)* ४

**लक्षात ठेवा :**

या प्रश्नप्रकारात चार वेगवेगळ्या प्रश्नप्रकारांपैकी तीन कृती दिल्या जातील; त्यांपैकी कोणत्याही दोन कृती सोडवणे आवश्यक आहे.

(i) **संकल्पनाचित्र पूर्ण करा :** या प्रकारात विषय देऊन आकृती दिली जाईल. उत्तरपत्रिकेत तशीच आकृती काढून उत्तर लिहायचे आहे.

(ii) **दिलेल्या विषयावर संकल्पनाचित्र (concept map) तयार करा :** या प्रकारात फक्त विषय दिला जाईल. त्या विषयाप्रमाणे आकृती काढून संकल्पनाचित्र पूर्ण करायचे आहे.

(iii) **कालरेषा तयार करा :** या प्रकारात कालरेषा काढून त्यावर दिलेल्या घटना दाखवायच्या आहेत किंवा दिलेल्या कालरेषेवर चौकटीत घटना व सन लिहायचे आहेत.

(iv) **ओघतक्ता (Flow chart) तयार करा :** या प्रकारात दिलेल्या घटकांवर किंवा विषयावर 'ओघतक्ता' तयार करायचा आहे.

## प्र. 2. (ब) थोडक्यात टिपा लिहा : *(कोणत्याही दोन)* ४

**लक्षात ठेवा :**

(i) या प्रश्नप्रकारात एकूण तीन विषयांवर टिपा लिहायला दिल्या जातील.

(ii) त्यांपैकी कोणत्याही दोन टिपांवर माहिती लिहायची आहे.

(iii) प्रत्येकी दोन गुण असल्याने उत्तरे 25 ते 30 शब्दांच्या मर्यादेत असावीत.

## प्र. 3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा : *(कोणतीही दोन)* ४

**लक्षात ठेवा :**

(i) या प्रश्नप्रकारात एकूण चार विधाने दिली जातील.

(ii) पैकी दोन विधाने सकारण स्पष्ट करावयाची आहेत.

(iii) प्रत्येकी दोन गुण असल्याने उत्तरात किमान दोन कारणे असावीत.

(iv) उत्तराचा प्रारंभ किंवा शेवट मूळ विधानाने करावा.

## प्र. 4. पुढील उतारा वाचून त्याखालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : ४

**लक्षात ठेवा :**

(i) पाठ्यपुस्तकातील 12 ते 15 ओळींचा एक परिच्छेद दिला जाईल व त्याखाली 1-1 गुणांचे 2 व 2 गुणांचा एक लघूत्तरी असे तीन प्रश्न विचारले जातील.

(ii) दिलेला उतारा व्यवस्थित वाचून उत्तरे निश्चित करा.

(iii) उत्तरे स्वत:च्या भाषेत लिहा.

(iv) उताऱ्याच्या क्रमाप्रमाणे प्रश्न क्रमवार असतीलच असे नाही.

## प्र. 5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : *(कोणतेही दोन)* ६

**लक्षात ठेवा :**

(i) या दीर्घोत्तरी प्रश्नप्रकारात एकूण चार उपप्रश्न विचारले जातील; पैकी दोन उपप्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे.

(ii) या प्रश्नात 'स्पष्टीकरण करा', 'साम्य वा भेद दाखवणारे तुलनात्मक मुद्दे लिहा', 'आजच्या परिस्थितीशी तुलना करा', 'तक्त्याच्या आधारे उत्तर लिहा' इत्यादी प्रकारचे प्रश्न विचारले जातील.

(iii) पाठ्यपुस्तकातील एखाद्या प्रसंगाचे, वास्तूचे वा व्यक्तीचे चित्र देऊन, त्या आधारे 'प्रश्नाचे उत्तर लिहा' असाही प्रश्न विचारला जाईल.

(iv) प्रत्येकी तीन गुणांच्या या प्रश्नात किमान छोटे सहा किंवा किमान तीन मोठे मुद्दे लिहिणे आवश्यक आहे.

(v) उत्तरे प्रत्येकी 60 शब्दांच्या मर्यादेत असावीत.

---

इतिहासाचे एकूण गुण **२८**

---

### राज्यशास्त्र

## प्र. 6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पुन्हा लिहा : २

**लक्षात ठेवा :**

(i) राज्यशास्त्रावरील या वस्तुनिष्ठ प्रश्नप्रकारात एकूण दोन विधाने दिली जातील.

(ii) प्रत्येक विधानात चार पर्याय दिले जातील. त्यांतून योग्य पर्याय निवडून मूळ विधानांसह उत्तरे लिहावीत.

(iii) निवडलेले पर्याय अधोरेखित करावेत.

(iv) सर्व विधानांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे.

## प्र. 7. पुढील विधाने *चूक* की *बरोबर* ते सकारण स्पष्ट करा : *(कोणतीही दोन)* ४

**लक्षात ठेवा :**

(i) या लघूत्तरी प्रश्नप्रकारात एकूण तीन विधाने दिली जातील; पैकी दोन विधानांची कारणे स्पष्ट करायची आहेत.

(ii) प्रथम, दिलेले विधान चूक आहे की बरोबर आहे, ते लिहावे.

(iii) नंतर ते विधान बरोबर असेल; तर का बरोबर आणि चूक असेल; तर का चूक याची कारणे लिहावीत.

(iv) चुकीचे विधान बरोबर करून न लिहिता, ते का चूक आहे, ते स्पष्ट करावे.

(v) उत्तराचा शेवट मूळ विधानाने करावा.

## प्र. 8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा : *(कोणतीही एक)* २

**लक्षात ठेवा :**

(i) या लघूत्तरी प्रश्नप्रकारात एकूण दोन संकल्पना दिल्या जातील; पैकी एका संकल्पनेचे उत्तर लिहावे लागेल.

(ii) संकल्पना स्पष्ट करताना त्या संकल्पनेचा पूर्ण अर्थ स्पष्ट करणे आवश्यक आहे.

(iii) दोन गुण असल्यामुळे प्रत्येक उपप्रश्नाचे उत्तर 25 ते 30 शब्दांच्या मर्यादेत असावे.

## प्र. 8. (ब) दिलेल्या सूचनांप्रमाणे कृती करा : *(कोणतीही एक)* २

**लक्षात ठेवा :**

(i) या प्रश्नप्रकारात 'संकल्पनाचित्र पूर्ण करा', 'कालरेषा पूर्ण करा', 'दिलेल्या विषयावर संकल्पनाचित्र तयार करा' किंवा 'ओघतक्ता तयार करा' अशा विविध प्रकारच्या कृती दिल्या जातील.

(ii) दिलेल्या विषयासाठी योग्य आकृती तयार करावी लागेल.

(iii) आकृती दिली असल्यास त्याच प्रकारची आकृती पेनाने काढावी लागेल.

(iv) संस्थेच्या शाखा-उपशाखा, उद्दिष्टे-वैशिष्ट्ये, वंशवृक्ष इत्यादी विषयांवर ओघतक्ता तयार करावा लागेल.

(v) संकल्पनाचित्रात मुख्य मुद्दा अचूकतेने लिहा, संपूर्ण वाक्य लिहिण्याची गरज नाही.

(vi) या प्रश्नप्रकारात दोन कृती दिल्या जातील; पैकी कोणतीही एक कृती लिहिणे अनिवार्य आहे.

## प्र. 9. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : *(कोणताही एक)* २

**लक्षात ठेवा :**

(i) या लघूत्तरी प्रश्नप्रकारात एकूण दोन उपप्रश्न दिले जातील; पैकी एका उपप्रश्नाचे उत्तर लिहिणे आवश्यक आहे.

(ii) या प्रश्नात 'उपयुक्तता स्पष्ट करा', 'साम्य-भेद दाखवणारी तुलना करा' किंवा 'तुमचे मत व्यक्त करा' अशा वेगवेगळ्या प्रश्नप्रकारांचा समावेश होतो.

(iii) दोन गुण असल्याने प्रश्नाचे उत्तर 25 ते 30 शब्दांच्या मर्यादेत असावे.

---

राज्यशास्त्राचे एकूण गुण **१२**

---

NAVNEET

# इतिहास – राज्यशास्त्र : कृतिपत्रिका 1 ली

**वेळ : 2.00 तास]** **[एकूण गुण : 40**

**सूचना :** *(1) सर्व कृती/प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.*

*(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे गुण दर्शवतात.*

*(3) प्रश्न/कृती **1** ते **5** इतिहासावर; तर प्रश्न/कृती **6** ते **9** राज्यशास्त्रावर विचारलेल्या आहेत.*

*(4) प्रश्न क्रमांक 1.(अ) व प्रश्न क्रमांक 6. मध्ये संपूर्ण विधाने लिहिणे आवश्यक आहे.*

*(5) प्रश्न क्रमांक 2. (अ) आणि 8. (ब) मध्ये दिलेली संकल्पनाचित्रे कृतिपत्रिकेनुसारच पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.*

*(6) प्रश्न क्रमांक 1. (ब) मधील प्रत्येक संचातील फक्त चुकीची जोडी ओळखून लिहिणे अपेक्षित आहे.*

*(7) प्रश्न क्रमांक 1. (अ), 1. (ब) व 6 या प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिक वेळा लिहिलेली असल्यास, प्रथम लिहिलेली उत्तरेच गुणांसाठी गृहीत धरली जातील.*

---

**प्र. 1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पुन्हा लिहा :** **3**

(1) 'हितोपदेश' या संस्कृत ग्रंथाचा --------- यांनी जर्मन भाषेत अनुवाद केला.

*(अ) जेम्स मिल* *(ब) फ्रेडरिक मॅक्सम्युलर*

*(क) माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन* *(ड) जॉन मार्शल*

(2) दूरदर्शन हे --------- माध्यम आहे.

*(अ) दृक* *(ब) श्राव्य*

*(क) दृक्-श्राव्य* *(ड) मुद्रण*

(3) थॉमस कुकने --------- विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला.

*(अ) हस्तकौशल्याच्या वस्तू* *(ब) खेळणी*

*(क) खाद्यवस्तू* *(ड) पर्यटन तिकिटे*

**प्र. 1. (ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून लिहा :** **3**

**[1]**

(i) द्वंद्ववादी पद्धती – हिरोडोटस

(ii) वर्गसंघर्षाचा सिद्धांत – कार्ल मार्क्स

(iii) स्त्रीवादाची मूलभूत भूमिका – सीमाँ-द-बोव्हा

(iv) संशोधनात दस्तऐवजांच्या कसून शोधावर भर – लिओपॉल्ड रांके

**[2]**

(i) 'प्रगती' या नियतकालिकाचे संपादक — त्र्यंबक शंकर शेजवलकर

(ii) 'दिग्दर्शन' हे पहिले मासिक सुरू केले — नरेंद्र शर्मा

(iii) 'दीनबंधू' हे वृत्तपत्र सुरू केले — कृष्णराव भालेकर

(iv) 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा ग्रंथ लिहिला. — पंडित नेहरू

**[3]**

(i) मल्लखांब — शारीरिक कसरतीचे खेळ

(ii) वॉटर पोलो — पाण्यातील खेळ


(iii) स्केटिंग — साहसी खेळ

(iv) बुद्धिबळ — मैदानी खेळ


**प्र. 2. (अ) दिलेल्या सूचनांप्रमाणे कृती करा : *(कोणत्याही दोन)*** **4**

- **पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा :**


**(1)**




**(2)**




**(3)**



**प्र. 2. (ब) थोडक्यात टिपा लिहा : *(कोणत्याही दोन)*** **4**

(1) वंचितांचा इतिहास

(2) प्रसारमाध्यमांची आवश्यकता

(3) विश्वकोश.

**प्र. 3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा : *(कोणतीही दोन)*** **4**

(1) इतिहासातील स्त्रियांच्या स्थानाचा नव्याने विचार होणे आवश्यक होते.

(2) आजच्या काळात परदेशात जाण्याचे प्रमाण वाढत आहे.

(3) ६ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रात 'पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो.

(4) खेळण्यांद्वारे इतिहासावर प्रकाश पडतो.

**प्र. 4. पुढील परिच्छेद काळजीपूर्वक वाचून, त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :** **4**

भारताच्या प्राचीन ते अर्वाचीन इतिहासाच्या संदर्भात दूरदर्शनवरून प्रसारित झालेली 'भारत एक खोज' ही मालिका महत्त्वाची आहे. पंडित नेहरू यांच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथावर आधारित ही मालिका होती. श्याम बेनेगल दिग्दर्शित या मालिकेने भारताच्या प्राचीन काळ ते अर्वाचीन काळाचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय इतिहास मांडला. सखोल संशोधन आणि सादरीकरण या पातळीवर ही मालिका सरस ठरली.

हडप्पा संस्कृती, वैदिक काळ, रामायण-महाभारताचा अन्वयार्थ, मौर्य कालखंड, तुर्क-अफगाण आणि मोगलांचे आक्रमण, मुघल कालखंड आणि मुघल बादशहांचे योगदान, भक्तिचळवळ, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, समाजसुधारणा चळवळी आणि स्वातंत्र्यसंग्राम अशा अनेक घटना या मालिकेतून मांडल्या गेल्या.

या मालिकेत नाट्य, लोककला, प्रबोधनपर माहिती असा आधार घेत नेहरूंच्या रूपातील कलावंत रोशन सेठ प्रास्ताविक व अन्वयार्थ सांगत असत. नेहरूंचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि त्याचे प्रभावी सादरीकरण यामुळेही मालिका संपूर्ण भारतभर वाखाणली गेली.

NAVNEET ®

**प्रश्न :**

(1) 'भारत एक खोज' ही मालिका कोणत्या ग्रंथावर आधारित आहे? **(1)**

(2) 'भारत एक खोज' या मालिकेचे दिग्दर्शन कोणी केले? **(1)**

(3) 'भारत एक खोज' ही मालिका लोकप्रिय ठरण्यास कोणते घटक कारणीभूत असावेत, असे तुम्हांला वाटते? **(2)**

**प्र. 5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : *(कोणतेही दोन)*** **6**

(1) लिओपॉल्ड व्हॉन रांके यांचा इतिहासविषयक दृष्टिकोन स्पष्ट करा.

(2) उपयोजित इतिहासाचा वर्तमानकाळाशी कसा सहसंबंध असतो?

(3) 'स्थानिक पर्यटन' आणि 'आंतरराष्ट्रीय पर्यटन' यांतील फरक स्पष्ट करा.

(4) ग्रंथालये आणि संग्रहालये राष्ट्रासाठी आवश्यक असतात, हे विधान स्पष्ट करा.

**प्र. 6. दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पुन्हा लिहा :** **2**

(1) पुढीलपैकी कोणत्या कायद्याद्वारे महिलांना त्यांचे स्वातंत्र्य जपण्यासाठी आणि स्वत:चा विकास साधण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण केले आहे? ----------

*(अ) माहितीचा अधिकार कायदा* *(ब) हुंडा प्रतिबंधक कायदा*

*(क) अन्नसुरक्षा कायदा* *(ड) यांपैकी कोणताही नाही*

(2) शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी --------- करण्यात आली.

*(अ) जलक्रांती* *(ब) हरितक्रांती* *(क) औद्योगिक क्रांती* *(ड) धवलक्रांती*

**प्र. 7. पुढील विधाने चूक की *बरोबर* ते सकारण स्पष्ट करा : *(कोणतीही दोन)*** **4**

(1) विशिष्ट प्रसंगी निवडणूक आयोग एखाद्या मतदारसंघात पुन्हा निवडणूक घेतो.

(2) चळवळीला खंबीर नेतृत्वाची गरज नसते.

(3) काही वेळा देशात प्रादेशिकतेची भावना बळावते.


**प्र. 8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा : *(कोणतीही एक)*** **2**

(1) हक्काधारित दृष्टिकोन.


(2) कामगार चळवळ.

**प्र. 8. (ब) दिलेल्या सूचनांप्रमाणे कृती करा : *(कोणतीही एक)*** **2**

**(1) निवडणूक प्रक्रियेसंबंधीचा पुढील ओघतक्ता पूर्ण करा :**



**(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :**




**प्र. 9. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :** ***(कोणताही एक)*** **2**

(1) निवडणूक आयोगाची कार्ये स्पष्ट करा.

(2) भारतातील शेतकरी चळवळीचे स्वरूप स्पष्ट करा.

---

NAVNEET ®